www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक | लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ | ■ वर्ष - ०२ ■ अंक ७४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, २६ जुलै २०२४ ■ रु. २/- | ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### मुंबईत नोकरी पण मराठी माणसाला 'नो एन्ट्री', जाहिरातीमुळे महाराष्ट्रातून संताप, मनसे ॲक्शन मोडवर; कंपनीने पोलीस बंदोबस्त वाढवला

● मुंबई, विशाल कारंडे :

इंडीड जॉब या वेब पोर्टरवरील प्रोडक्शन मॅनेजर ही जागा भरण्यासाठी केलेली जाहिरात वादग्रस्त ठरली आहे. या जाहिरातीत मराठी उमेदवारांनी अर्ज करू नये असं म्हटलं होतं. त्यावरून मोठा वाद निर्माण झालाय. इंडीड जॉब ही जाहिरात सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झालीये. मुंबईच्या मरोळ एमआयडीसी येथे आर्या गोल्ड या कंपनीत प्रोडक्शन मॅनेजरची जागा असल्याची माहिती देण्यात आली होती. मात्र, मराठी माणसाने अर्ज करु नये, असे म्हटल्याने महाराष्ट्रातून संताप व्यक्त करण्यात आला आता यानंतर कंपनीला उपरती झाल्यानंतर जाहिरातीत बदल केला असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, मराठी माणसाला 'नो एन्ट्री' असल्याची माहिती मिळताच मनसे कामगार सेनेचे उपाध्यक्ष राज पार्टे कंपनीमध्ये दाखल झाले आहेत.

पान २ वर

## मुंबई, पुणे, ठाणे शहरांसह राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील आपत्ती नियंत्रण कक्षातून घेतला परिस्थितीचा आढावा

■ महापालिका आयुक्त विभागीय आयुक्तांची दूरध्वनीवरून चर्चा

■ बचाव आणि मदतकार्यासाठी सतर्क राहण्याचे

■ राज्य प्रशासन आणि राज्य आपत्ती निवारण यंत्रणेला निर्देश



● मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबई, पुणे, ठाणे शहरांसह राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळीच मंत्रालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षात भेट देऊन राज्यातील अतिवृष्टी व पूरस्थितीचा आढावा घेतला तसेच संबंधित अधिकाऱ्यांना परस्पर समन्वय व सहकार्य ठेवून बचत व मदतकार्य करण्याचे निर्देश दिले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक श्री. लहू माळी यांनी त्यांना माहिती दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नियंत्रण कक्षातून राज्यातील प्रमुख शहरांचे महापालिका आयुक्त तसेच विभागीय आयुक्तांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून माहिती घेतली तसेच बचाव व मदतकार्यासाठी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या. एनडीआरएफ अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून त्यांचीही मदत तातडीने उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी. आपत्तीग्रस्त नागरिकांच्या निवारा व अन्नधान्याची सोय करावी. राज्य प्रशासन तसेच राज्य आपत्ती निवारण यंत्रणेने जिल्हा यंत्रणांशी संपर्क ठेवून परस्पर समन्वय व सहकार्याने काम करावे. नागरिकांसाठी बचाव व मदत तात्काळ पोहोचवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. नागरिकांनीही अतिवृष्टी व पुरापासून बचावासाठी आवश्यक काळजी घेण्याचे व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ नजीकच्या प्रशासकीय यंत्रणेशी संपर्क साधण्याचे तसेच महत्त्वाच्या कारणांशिवाय घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच कार्यकर्त्यांनीही नागरिकांना सक्रिय मदत करावी, असे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

## पुण्यात पाच इमारती पाण्याखाली, 200 हून अधिक लोक अडकले

● पुणे, अभिजित येरल्लू :



पुणे : पुणे शहर आणि जिल्ह्याच्या परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. सिंहगड रस्ता इथं 5 सोसायट्यांमध्ये पाणी शिरलं आहे. महापालिका कर्मचारी, प्रशासन आणि पोलीसही गायब असल्याची माहिती आहे. या सोसायट्यांमध्ये तब्बल 200 लोक अडकले होते. मात्र मदतीसाठी कोणतीही यंत्रणा वेळेत पोहोचू शकली नाही. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

एकता नगरी सिंहगडरोड, द्वारका, जलपुजन, शारदा सरोवर, शाम सुंदर या सोसाट्यांमध्ये पुराचं पाणी शिरलं आहे. पार्किंगमध्ये पाणी आल्यानं वाहनांचंही नुकसान झाल्याची माहिती आहे. यावर्षी पुणे महानगरपालिकेनं महापुराच्या अनुशंगाने कोणतीही पूर्वतयारी केली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

पुण्यात पावसाचा जोर वाढला असल्यानं जिल्हाधिकाऱ्यांनी पुणे शहर आणि जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रात 35 हजार 574 क्युसेक्स विसर्ग सुरू करण्यात येत आहे. तसेच पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावं असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

पान २ वर

## पावसामुळे मुंबई-पुणे-मुंबई रेल्वे वाहतूक बंद; प्रवाशांचे हाल, नदीने पातळी ओलांडली



● मुंबई, दिगंबर जाधव :

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे आज जलमय झाली असून पुण्यातील कित्येक वर्षांचा रेकॉर्ड आजच्य पावसाने तोडला आहे. शहरातील अनेक भागात पाणीच पाणी झालं असून पाण्यातून मार्ग नागरिकांना काढावा लागत आहे. दुसरीकडे मुंबईतही मुसळधार पाऊस सुरू असून कल्याण, ठाणे आणि परिसरात पावसाच्या पाण्यामुळे तेथील नद्यांना पूर आला आहे. बदलापूरजवळील उल्हास नदीला पूर आला असून रस्तेही जलमय झाले आहेत. त्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. सध्या कर्जत ते कल्याण वाहतूक बंद असून पुणे-मुंबई मध्य रेल्वे मार्गावरील काही महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, पुण्याला जाणाऱ्या आणि पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत.

पुण्यात पावसामुळे आज जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. पालकमंत्री अजित पवार यांनीही पुण्यातील काही भागांत दौरा करुन पाहणी केली. तर, प्रशासनही अलर्ट मोडवर आहे. त्यातच, मध्य रेल्वे प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुंबई पुणे डेक्कन क्वीन एक्सप्रेस, मुंबई पुणे प्रगती एक्सप्रेस आणि पुणे मुंबई इंटरसिटी एक्सप्रेस आज 25 जुलै रोजी रद्द करण्यात आल्या आहेत. तर, उद्या सकाळी पुणे-मुंबई डेक्कन एक्स्प्रेस, पुणे-मुंबई प्रगती एक्सप्रेस आणि मुंबई पुणे इंटरसिटी एक्सप्रेसही रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे, पुणे-मुंबई व मुंबई-पुणे येथील प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली आहे.

पान २ वर

### उल्हास नदीची पातळी वाढली

मुंबईत अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस होत आहे, त्याशिवाय हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. हे पाहता मुंबई महापालिका प्रशासनाने मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमांच्या पहिली ते बारावीच्या शाळांना आज सुट्टी देण्यात आली आहे. तर, मध्य रेल्वेनेही पुणे-मुंबई रेल्वे मार्गावरील अनेक एक्सप्रेस ट्रेन्स रद्द केल्या आहेत. बदलापूर आणि वांगणी दरम्यान उल्हास नदीच्या पाण्याच्या पातळीचा अंदाज घेऊन या एक्सप्रेस रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मध्य रेल्वे सांगितले आहे. सध्या कर्जत ते कल्याण वाहतूक बंद आहे.

## मुंबई-गोवा, मुंबई-नाशिक महामार्गसुरक्षित होण्यासाठी समन्वयाने काम करावे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### महामार्गांच्या कामाची पाहणी करण्यासाठी गणेशोत्सवापूर्वी मुख्यमंत्री भेट देणार

● मुंबई, विशाल कारंडे :



मुंबई - मुंबई- गोवा महामार्ग आणि मुंबई- नाशिक महामार्गावर असणाऱ्या खड्डयांमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळून नागरिकांचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासोबत जिल्हा प्रशासनाने समन्वयाने काम करावे. तसेच दोन्ही महामार्गावरील बायपास, सर्व्हीस रोड यांचे मजबुतीकरण करुन गणेशोत्सवापूर्वी मुंबई- गोवा महामार्ग आणि मुंबई- नाशिक महामार्ग खड्डेमुक्त करावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. 10 ऑगस्टनंतर दोन्ही महामार्गाच्या कामांची पाहणी करण्यासाठी भेट देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले.मुंबई-गोवा महामार्ग आणि मुंबई- नाशिक महामार्गाच्या सद्यस्थितीबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

पान २ वर

## पावसाने अंत्यसंस्कारही रोखले, सांगलीत कृष्णेचं पाणी स्मशानभूमीत!

● सांगली , सचिन कदम :



सांगलीत कृष्णा नदीची पाणी पातळी वाढल्याने नदीकाठी असलेल्या स्मशानभूमीमध्ये पाणी शिरलं आहे. त्यामुळे पावसाने अंत्यसंस्कार सुद्धा रोखल्याचे चित्र आहे. कृष्णा नदीकाठी असलेल्या स्मशानभूमीमध्ये पाणी शिरले असून नदीकाठच्या या स्मशानभूमीतील अंत्यसंस्कार आता बंद केले जाणार आहेत. पर्यायी मार्ग म्हणून कुपवाड भागातील स्मशानभूमीमध्ये आता अंत्यसंस्कार प्रक्रिया केले जाणार असल्याचे सांगली महापालिका प्रशासनाने माहिती दिली.

मिरजमधील वॉर्ड क्र 20 कृष्णा घाट स्मशानभूमीत देखील पुराचे पाणी आले असल्याने स्मशानभूमी बंद करण्यात आली आहे. पर्यायी स्मशानभूमी पंढरपूर रोडला सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, आयर्विन पुलाजवळील पाणीपातळी 30 फुटांवर गेल्यानंतर सांगलीच्या सूर्यवंशी प्लॉटमध्ये पुराचे पाणी दाखल झाले. याठिकाणच्या 10 कुटुंबांचे बुधवारी स्थलांतर करण्यात आले.

पान २ वर

## गंभीर जखमी चीनच्या नाविकाला दिलं जीवदान

### नौदल जवानांनी जीवाची बाजी लावून रुग्णाला काढलं सुरक्षित बाहेर -



● मुंबई, विशाल कारंडे :

गंभीर जखमी झालेल्या चीनच्या नाविकाला भारतीय नौदलाच्या जवानांनी जीवाची बाजी लावून बचावलं आहे. मुंबईजवळील समुद्रात भारतीय नौदलाच्या जवानांनी बुधवारी या चीनच्या नागरिकांला सुरक्षित बाहेर काढण्यासाठी जीवाची बाजी लावली. यावेळी चीनी नाविकाला भारतीय नौदलाच्या हेलिकॉप्टरनं एयर स्टेशनवर नेण्यात आलं. त्यानंतर पुढील उपचार करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यानं दिली.

पान २ वर

## महाडमध्ये सावित्रीचं रौद्ररुप, काळ नदीवरील पूल गेला वाहून; प्रशासन अलर्ट, NDRF तैनात, आमदारांकडून पाहणी

● रायगड , दिगंबर जाधव :



राज्यात पावसाने हाहाकार उडवला असून मुंबई, पुण्यासह कोकणातही मुसळधार पाऊस पडत आहे. जोरदार पावसामुळे नद्या दुथड्या भरुन वाहत आहेत. कोकणाती काही नद्यांनी पाण्याची पातळी ओलांडली असून धरणांतून विसर्गही करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील हेटवणे धरणाच्या पाणी पातळीत 83 टक्के वाढ झाली असून धरणाचे 6 दरवाजे उघडण्यात आले आहेत. 6 गेट मधून 3.35 घमी/से एवढा पाण्याचा विसर्ग करम्यात आला आहे. तर, नदी पात्रात पाण्याची वाढ झाल्याने नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. त्यामुळे प्रशासनाने नदीकाठच्या सर्व नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय. दुसरीकडे सावित्री नदीनेही रौद्ररुप धारण केलं असून पाण्याने पुलाची पातळी गाठल्याचं पाहायला मिळत आहे.

रायगडमधील महाड पोलादपूर परिसरात पावसाची तुफान बॅटिंग सुरू आहे. डोंगर माथ्यावरती जोरदार पाऊस कोसळत असल्यामुळे महाडमध्ये सावित्री नदीतने धोक्याची पातळी ओलांडली आहे. बुधवारी गांधारी नदी देखील दुथडी भरुन वाहत होती, महाडमधील बिरवाडी भागातील कुंभारवाडा परिसरामध्ये रस्त्यावरती पाणी साचल्याने अनेक रस्ते पाण्याखाली गेले आहेत. महाडमध्ये सावित्री नदिने रौद्ररुप धारण केल्याने महाडमध्ये पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पान २ वर

### काळ नदीवरील पुल गेला वाहून

दरम्यान, आमदार भरत गोगावले हे मुंबईमध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या मुंबई गोवा महामार्गाच्या आढावा बैठकीसाठी येथून रवाना झाले आहेत. महाड मधील संभाव्य परिस्थितीचा आढावा घेत आमदार गोगावले यांनी प्रशासनाला अनेक आपत्कालीन परिस्थिती मधील उपाय योजनेच्या सूचना केलेल्या आहेत. महाड तालुक्यामध्ये काल सायंकाळपासून पावसाने दमदार हजेरी लावली आहे. त्यामध्ये महाड शहर तसेच बिरवाडी शहरांमध्ये पुराचे पाणी काही भागात पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. तालुक्यातील सावित्री व काळ नदीसह छोट मोठ्या ओढ्यानी धोक्याची पातळी ओलांडली आहे. सह्याद्रीवाडी येथील कसबेशिवथरला जोडणारा काळ नदीवरचा पुल देखील पुराच्या पाण्यात वाहून गेला आहे. त्यामुळे, सह्याद्रीवाडी गावाचा संपर्क तुटला आहे..

## पुणे शहर व जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला परिस्थितीचा आढावा

### बचाव आणि मदतकार्यासाठी सतर्क राहण्याचे जिल्हा प्रशासन आणि आपत्ती निवारण यंत्रणेला निर्देश



मुंबई :- पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज सकाळीच जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती निवारण प्राधिकरणाचे प्रमुख श्री. सुहास दिवसे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून जिल्ह्यातील पूरपरिस्थिती तसेच बचाव व मदतकार्याच्या तयारीचा आढावा घेतला. खडकवासला तसेच जिल्ह्याच्या बहुतांश भागात मुसळधार पाऊस होत असल्याने प्रशासन तसेच आपत्ती निवारण यंत्रणेने सतर्क राहुन नागरिकांना तात्काळ मदत पोहोचवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पुणे शहर, पिंपरी चिंचवडसह जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ नजीकच्या प्रशासकीय यंत्रणेशी संपर्क साधण्याचे तसेच महत्त्वाच्या कारणांशिवाय घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# संपादकीय

## आठवेल का सारे

स्वतंत्रपणे विचार करून बराच काळ लोटला अशा एका वर्गाकडून देशाच्या औद्योगिक अवस्थेसाठी पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांस बोल लावले जातात. त्यांच्या मते पं. नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याने आपली अवस्था अर्थव्यवस्थेच्या मुद्द्यावर ना इकडे ना धड तिकडे अशी झाली. सार्वजनिक उपक्रम नावाने केंद्र सरकारने जनतेच्या पैशाने जे काही उपक्रम सुरू केले ते पांढरे हत्ती ठरले आणि या सरकार-केंद्री विकासधोरणामुळे आपण खासगी उद्योजकांसही पूर्णपणे उत्तेजन देऊ शकलो नाही. वास्तविक पं. नेहरू यांस मिश्र व्यवस्थेचा आधार घ्यावा लागला कारण नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशात भांडवलदारांची संख्या मूठभरही नव्हती आणि जागतिक भांडवलदारांस देशात गुंतवणूक करण्याइतका विश्वास नव्हता. त्यामुळे सरकारपुढे स्वत:च भांडवल ओतण्याखेरीज अन्य काही पर्याय राहिला नाही. तशाही परिस्थितीत होत्या त्या खासगी उद्योजकांस मोकळे रान दिले असते तर आता जसा दोन उद्योगगृहांची धन करणारी धोरणे आखत असल्याचा आरोप विद्यमान सरकारवर होतो तसा तो पं. नेहरू यांच्यावर झाला असता. सबब परिस्थितीची अपरिहार्यता म्हणून त्यांस सरकारी कंपन्या सुरू कराव्या लागल्या, असा युक्तिवाद करता येईल. तसे काही करणे हा प्रस्तुत संपादकीयाचा मुळीच विचार नाही. तर पं. नेहरू यांनी आखून दिलेल्या समाजवादी पायवाटेचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गात व्हावे या हेतूने ताजा अर्थसंकल्प किती आणि कसे प्रयत्न करतो हे दाखवून देणे हा यामागील विचार. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच खरे पं. नेहरू यांचे समाजवादी उत्तराधिकारी कसे ठरतात, हेही लक्षात येईल.

सरकारी कंपन्या हे जर समाजवादी विचारधारेचे लक्षण असेल तर या सरकारी कंपन्या अधिकाधिक बळकट कशा होतील हा विद्यमान सरकारचा प्रयत्न आहे. म्हणून सरकारी कंपन्यांच्या खासगीकरणातून वा समभाग/ मालकी विक्रीतून, म्हणजेच निर्गुंतवणुकीद्वारे, निधी उभारण्याचा विचारही विद्यमान सरकार करताना दिसत नाही. उलट जे लक्ष्य होते तेही कमी कमी करण्याकडेच सरकारचा कल दिसतो. या सरकारने २०२० साली निर्गुंतवणुकीतून एक लाख पाच हजार कोटी रु. उभे करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. प्रत्यक्षात जमा झाले ५०,२९८ कोटी रु. पुढील वर्षीचे उद्दिष्ट होते दोन लाख १० हजार कोटी रु. आणि प्रत्यक्षात हाती आले फक्त ३२,८३५ कोटी रु. तरीही हिरमुसले न होऊन २०२२ सालात निर्गुंतवणुकीतून आपण एक लाख ७५ हजार कोटी रु. उभारू शकू असा विश्वास सरकारला होता. पण हाती आलेल्या अवघ्या १३,५६१ कोटी रुपयांनी तो धुळीस मिळवला. त्यामुळे हाय खाल्लेल्या सरकारने पुढील वर्षासाठी हे लक्ष्य ६५ हजार कोटी रुपयांपर्यंत खाली आणले आणि सध्याच्या अर्थसंकल्पात २०२४ सालासाठी तर ते जेमतेम ५० हजार कोटी रु. इतकेच अभिप्रेत आहे. पण उद्दिष्टपूर्तीचा हा इतिहास लक्षात घेतला तर ते किती पूर्ण होईल याविषयी शंका न येणे नवलाईचेच ठरेल. याउलट रिझर्व्ह बँक आणि अन्य काही सरकारी मालकीच्या आस्थापनांकडून यंदाच्या वर्षात तीन लाख कोटी रुपये लाभांशाच्या रूपाने मिळतील अशी अपेक्षा अर्थमंत्री बाळगतात. याचा अर्थ खासगीकरण, निर्गुंतवणुकीकरण अशा उदारमतवादी अर्थधोरणांस केंद्राने अनौपचारिकपणे तरी तिलांजली दिली असून सरकारी मालकीच्या कंपन्यांवरील पकड अधिक घट्ट करण्याकडेच सरकारचा कल असेल. म्हणजे सरकारी कचाट्यातून सुटलेली शेवटची कंपनी 'एअर इंडिया' म्हणायचे!

हा समाजवादी अर्थविचार या अर्थसंकल्पातील रोजगारवृद्धीसाठी घेतलेल्या निर्णयांतूनही दिसतो. बेरोजगारांस पहिल्या नोकरीस दिल्या जाणाऱ्या विद्यावेतनाचा काही भाग उचलणे अथवा आस्थापनांच्या वेतनखर्चास हातभार लावणे हे उपाय या विचाराचे निदर्शक. सरकार वेतनखर्चात मदत करणार आहे म्हणून कोणी कोणास नोकरीस ठेवेल हा विचारच मुदलात हास्यास्पद. उद्योगांकडून आपापल्या आस्थापनांत कर्मचारी नेमले जातात ते उत्पादनांस असलेली मागणी, विस्तार योजना आदी मुद्द्यांचा विचार करून. "चला, चला... सरकार निधी देणार आहे म्हणून आपण नोकरभरती करू या'' असा विचार करण्याइतका आणि त्याप्रमाणे कृती करण्याइतका बावळटपणा कोणा उद्योगांकडून होईल हे अविश्वसनीय. तेव्हा या अशा उपायांमुळे दोन-चार कोटी रोजगार निर्माण होतील असे मानणे म्हणजे हिमाचलात समुद्र निर्माण झाला तर किनारी पर्यटन कसे वाढेल असा विचार करण्यासारखे. उद्योग बाजारपेठेच्या नियमांवर चालतात. तसेच अपेक्षित असते. बाजारपेठेची चिंता नसते ती फक्त सरकारला आणि सरकारी उद्योगांना. हे सरकारी उद्योग अधिकाधिक सशक्त करणे हाच तर समाजवादी विचार. थॉमस पिकेटी आदी अर्थतज्ज्ञांच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या काँग्रेसच्या 'न्याय'पत्रात हीच खरी मागणी आहे.



### आजची चित्रोळी

म्हातार्‍याने ( पुष्यानें ) भरले पाणी
तरणा नसे जवान
बरसून गेला छान
आषाढे भागविली तहान !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

पान १ वरून...

### मुंबईत नोकरी पण मराठी माणसाला 'नो...

मराठी माणसाला 'नो एन्ट्री' म्हटल्यामुळे मनसे आक्रमक झाली आहे. या जाहिरातीची माहिती मिळताच महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली असून मनसेचे नेते राज पार्टे कामगार नेते हे आर्या गोल्ड कंपनीच्या परिसरात दाखल झाले आहेत. शिवाय मनसे नेते संदीप देशपांडे देखील या कंपनीमध्ये येणार आहेत. मनसे कार्यकर्ते कंपनीमध्ये दाखल होताच पोलिसांचा कंपनीमध्ये मोठा फौज फाटा तैनात करण्यात आला आहे. मनसे नेते आक्रमक झालेले पाहाताच आर्या गोल्ड कंपनी बाहेर शंभर ते दीडशे पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मनसे आणि ठाकरे गटाचे कार्यकर्ता आर्या गोल्ड कंपनीमध्ये दाखल झाले आहेत. यापूर्वी गिरगावमध्येही अशाच जाहिरातीमुळे मोठा वाद झाला होता. त्या जाहिरातीचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले होते. त्यानंतर राज्यातील अनेक नेत्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली होती.

वर ग्राफिक डिझायनरची जागा भरण्यासाठी केलेली जाहिरात वादग्रस्त ठरली होती. या जाहिरातीत मराठी उमेदवारांनी अर्ज करू नये असं म्हटलं होतं. त्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. लिंक्डिनवरील ही जाहिरात सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाली होती . एचआर जान्हवी सराना या नावाने लिंक्डिनवर एक जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीमध्ये मुंबईत ग्राफिक्स डिझाईनसाठी जागा असल्याची माहिती देण्यात आली होती. मात्र, मराठी माणसाने अर्ज करु नये, असे म्हटल्याने महाराष्ट्रातून संताप व्यक्त करण्यात आला होता.

### पुण्यात पाच इमारती पाण्याखाली, 200 हून...

हवामान विभागानं येत्या काही तासात पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसरात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिलाय. या भागातील शाळांनाही सुट्टी जाहीर करण्यात आलीय. दरम्यान खडकवासला धरण १०० टक्के भरलंय. तर टेमघर ५७ टक्के, वरसगाव ६३ टक्के, पानशेत ७६ टक्के भरलंय.पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी केले आहे.

### पावसामुळे मुंबई-पुणे-मुंबई रेल्वे वाहतूक बंद;...

कल्याणमध्ये 200 नागरिकांच्या घरात पाणी

कल्याण मधील शिवाजीनगर परिसरामध्ये वालधुनीच्या कडेला असणाऱ्या 200 हून अधिक नागरिकांच्या घरांमध्ये गुडघाभर पाणी शिरले आहे. येथील नागरिकांचे स्थलांतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने केले आहे. मात्र, संसार उध्वस्त झाल्याने नागरिक भयभीत झाल्याचं दिसून आलं.

पुण्यात जोरदार पाऊस सुरु असून प्रशासन कमी पडत असल्याची टीका भाजपचे नवनिर्वाचित आमदार अमत् गोरखे यांनी केली आहे. येत्या दोन दिवसात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासनाने आणखी तयारी करून पाणी साचण्यामागील नेमके कारणांचा शोध घेऊन ती दूर करण्याची मागणी आमदार गोरखे यांनी केली आहे.

मुंबईहुन-पुण्याकडे जाणाऱ्या या एक्सप्रेस रद्द

डेक्कन क्वीन एक्सप्रेस

प्रगती एक्सप्रेस

आज पुण्याहून-मुंबईकडे जाणाऱ्या या एक्सप्रेस रद्द

इंटरसिटी एक्सप्रेस

उद्या पुण्याहून-मुंबईकडे जाणाऱ्या या एक्सप्रेस रद्द

डेक्कन एक्स्प्रेस

प्रगती एक्सप्रेस

उद्या मुंबईहुन-पुण्याकडे जाणाऱ्या या एक्सप्रेस रद्द

### मुंबई-गोवा, मुंबई-नाशिक महामार्गसुरक्षित...

या बैठकीला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, बंदरे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार किशोर दराडे, भरत गोगावले, माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत, मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव आय.एस.चहल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरीक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता श्री. श्रीवास्तव यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरुन लाखो चाकरमनी कोकणात जातात. या काळात त्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणे आवश्यक आहे. यासाठी गणेशोत्सवापूर्वी या मार्गावरील जड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवावी. मुंबई- गोवा महामार्गावरील शक्य तेवढ्या मार्गाचे रुंदीकरण करुन वाहतूक गतिमान होईल, याकडे लक्ष द्यावे. महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी रिफ्लेक्टर लावावेत, दरडप्रवण असणाऱ्या परशूराम घाटात मुंबई- पुणे एक्सप्रेवच्या धर्तीवर सुरक्षा जाळया लावाव्यात. ज्या भागातील रस्त्याचे काम पूर्ण झाले असेल तेथील बांधकाम साहित्य हटवून रस्ता मोकळा करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.तसेच गणेशोत्सवादरम्यान माणगांव, इंदापूर या शहरात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी. गणेशभक्तांच्या सोईसाठी महामार्गावर दर 10 किमी अंतरावर वैद्यकीय मदत कक्ष आणि वाहन दुरुस्तीची व्यवस्था करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंबई-नाशिक महामार्गाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. यावेळी ते म्हणाले, की या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खड्डे बुजवण्याबरोबर भिवंडी परिसरातील रस्त्यावर उभे असणाऱ्या अवजड वाहनांच्या पार्कींगसाठी व्यवस्था करावी. मुंबई ते नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी होणारी ठिकाणे ओळखून त्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासन यांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध पद्धतीने करावे, यासाठी महामार्ग प्राधिकरणाने ठाणे जिल्ह्यात वरीष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

यावेळी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत देखील संबधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

### पावसाने अंत्यसंस्कारही रोखले, सांगलीत...

पाणीपातळीत वाढ झाली तर परिसरातील आणखी काही कुटुंबांचे स्थलांतर करावे लागणार असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले. सांगलीच्या सूर्यवंशी प्लॉटमध्ये मध्यरात्री पाणी दाखल झालं आहे.

महापालिकेच्या सुचनेनुसार काही कुटुंबांनी नातेवाईकांकडे तर काहींनी महापालिकेच्या पुनर्वसन केंद्रात स्थलांतर केले. कोयना धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम राहिल्यास कृष्णेच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने सूर्यवंशी प्लॉटमधील सर्व नागरिकांसह इनामदार प्लॉट, कर्नाळ रोड, शिवमंदिर परिसर, मगरमच्छ कॉलनीतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. घरातील साहित्य सूरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आवाहन केले आहे.

### गंभीर जखमी चीनच्या नाविकाला दिलं जीवदान

गंभीर जखमी झाला होता नाविक : भारतीय नौदलाच्या मेरिटाइम रेस्क्यू को-ऑर्डिनेशन सेंटर (एमआरसीसी) इथं 51 वर्षीय चीनी नाविक गंभीर जखमी झाल्यानं त्याला तत्काळ मदतीची गरज असल्याची माहिती देण्यात आली. या नाविकाला तत्काळ एयरलिफ्ट करण्याची विनंती यावेळी चीनी नाविकांनी केली. त्यामुळे भारतीय नौदलाच्या जवानांनी तत्काळ धाव घेत या नाविकाला बाहेर काढण्यासाठी बचाव मोहीम राबवण्यात आली. या नाविकाला गंभीर दुखापत झाल्यानं त्याच्या शरीरातील रक्त कमी झाल्याची तक्रार नाविकांनी भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांकडं केली. त्यामुळे या नाविकाला तत्काळ सुरक्षित बाहेर न काढल्यास त्याच्या जीवाचा धोका वाढला होता. जहाजाच्या ब्रिज विंगवरून करण्यात आलं एअरलिफ्ट : मेरिटाइम रेस्क्यू को-ऑर्डिनेशन सेंटर (एमआरसीसी) मुंबईनं ही माहिती तत्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. मंगळवारी मुंबईपासून चीनी जहाज 'झोंग शान मेन' 200 एनएम (अंदाजे 370 किमी) यावर एक चीनी नाविक गंभीर जखमी झाला होता. त्याला तत्काळ मदतीची गरज होती. त्यामुळे वैद्यकीय आणीबाणीला प्रतिसाद देत भारतीय नौदल हवाई स्टेशन INS शिक्रा इथून पहाटे 5.50 वाजता एक सीकिंग हेलिकॉप्टर चीनी नाविकाच्या मदतीला पाठवण्यात आलं. 45 नॉट्सपेक्षा जास्त वारं वाहत असल्यानं रुग्णाला बाहेर काढणं मोठं आव्हान होतं. जहाज जड रोल अनुभवत होत, तर डेकवर स्पष्ट क्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे जवानांना जीवाची बाजी लावून रुग्णाला जहाजाच्या ब्रिज विंगवरून यशस्वीरित्या एअरलिफ्ट करण्यात आलं," असं नौदलाच्या अधिकाऱ्यानं स्पष्ट केलं. विशेष म्हणजे याच परिसरात असलेलं ICGS सम्राट यालाही मदतीसाठी वळवण्यात आलं. एमआरसीसी (एमबीआय) नं भारतीय नौदलासोबत केलेल्या या संयुक्त ऑपरेशनमुळे रुग्णाला सुरक्षित आणि वेळेवर बाहेर काढण्यात यश आलं, असं नौदलाच्या अधिकाऱ्यानं सांगितलं आहे.


### महाडमध्ये सावित्रीचं रौद्ररुप, काळ नदीवरील ...

त्यामुळे, प्रशासनालाही सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाडमधील नदी किनारी भाग पुराच्या विळख्यात असून शहरात एनडीआरएफची टीम तैनात आहे. दरम्यान, शहरांतील दुकानदारांची हळूहळू स्थळांतरकडे वाटचाल होताना दिसून येत आहे. महाडचे आमदार भरत गोगावले यांनी पूर परिस्थितीचा आढावा घेत महाड शहरातील अनेक भागात पाहणी केली. त्यांच्यासोबत महाडचे प्रांताधिकारी, नगर परिषद मुख्याधिकारी देखील उपस्थित होते.

दरम्यान, आज सकाळपासून पुणे, मुंबई आणि उपनगरात पावसाने दमदार हजेरी लावली असून जिकडे तिकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती आहे. पुण्यातील अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झालं असून पालकमंत्री अजित पवार यांनी आढावा घेतला आहे. त्यानंतर, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत पुण्यातील पावसासंदर्भात अपडेट दिली. मात्र, आज पहिल्यांदाच पुणे पावसाच्या पाण्याने धुवून निघाल्याचं पाहायला मिळालं.

# निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर



असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वत:च्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषत: मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@ gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## थोडक्यात

### कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनाच्या फरकाची थकीत रक्कमेचा हिशोब महिनाभरात अदा करणार

कल्याण : २४ फेब्रुवारी २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत कंत्राटी कामगारांना सुधारित किमान वेतन, भत्ते लागू केले होते. कल्याण डोंबिवली महापालिकेने २०१५ ते २०२३ पर्यंत फरकाची थकीत रक्कम सुमारे सहा कोटी पंच्याहत्तर लाख सत्याऐंशी हजार रुपयांचा हिशोब महिन्याभरात तपासून अदा करण्याची कार्यवाही करण्याचे आश्वासन श्रमिक जनता संघाचे शिष्टमंडळाला आयुक्त डॉ इंदूराणी जाखड यांनी बैठकीत दिले. जे कामगार वयोमानानुसार कामावरून कमी करण्यात आले आहे त्यांना नियमानुसार उपदानाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आले. कामगारांच्या वेतनातून ठेकेदार मेसर्स सिक्युअर वन सेक्युरिटी सर्व्हिसेस कडून बेकायदेशीर कपात करण्यात येत असल्याची बाब लक्षात आणून देण्यात आली. तसेच पगारातून दरमहा पीपीईच्या नावाखाली वेतनातून कपात करण्यात येणारे हजारो रुपये कोणत्या कारणासाठी कपात केली जाते? यांचे स्पष्टीकरण मिळावे अशी भूमिका युनियन तर्फे मांडल्यानंतर या प्रकरणी ताबडतोब चौकशी करून अहवाल सादर करण्याचा निर्णय ही बैठकीत घेण्यात आला.

# कल्याण-शिळफाटा, मलंगरोड जलमय

कल्याण : कल्याण, डोंबिवली शहरांच्या वेशीवरील सर्वाधिक वर्दळीचे शिळफाटा आणि मलंगरोड हे दोन्ही रस्ते जलमय झाले आहेत. या रस्त्यावर जागोजागी वाहने अडकून पडली आहेत. या रस्त्यांच्या दुतर्फाची दुकाने पाण्याखाली गेली आहेत. मलंगरोड बुधवारपासून पाण्याखाली गेला आहे.

कल्याण-शिळफाटा हा सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे. हा रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा तयार करताना या रस्त्यावरील चढउतार काढून टाकण्यात आले आहेत. त्यामुळे हा रस्ता समतल झाला आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजुला मुसळधार पावसाचे पाणी तुंबले की हे पाणी थेट आता रस्त्यावर येत आहे. या रस्त्याचा काटई ते मानपाडा, काटई ते शिळफाटा दत्तमंदिर चौक भाग हा समतल आहे. त्यामुळे या भागात रात्रीपासून पाणी तुंबण्यास सुरूवात झाली. गुरुवारी सकाळी या रस्त्याचा काही भाग पाण्याखाली गेला. काटई ते कोळे रस्त्यावर पाणी तुंबले आहे.



नेवाळी ते बदलापूर रस्त्यावर अनेक ठिकाणी पाणी रस्त्यावर आले आहे. काटईकडून बदलापूर, कर्जतकडे जाणारी वाहने जागोजागी अडकून पडली आहेत.

शिळफाटा रस्त्यावर पाणी आल्याने या रस्त्याच्या काटई ते खिडकाळी, मानपाडा भागातील अनेक दुकानांमुळे पुराचे पाणी शिरले आहे. फर्निचर, वाहनांची शोरूमना सर्वाधिक फटका बसला आहे. शिळफाटा जलमय झाल्याने सकाळी नवी मुंबई, मुंबई दिशेने निघालेला बहुतांशी नोकरदार वर्ग शिळफाट्यावरील पाणी पाहून या पुरात अडकायला नको म्हणून माघारी परतला. काही दुचाकी स्वार आव्हान स्वीकारून या पाण्यातून शिळफाटा दिशेने पोहचले.

## ठाणे जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी

ठाणे : जिल्ह्यात बुधवार रात्रीपासून सतत सुरू असलेला पाऊस आणि त्याचबरोबर हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीचा इशारा यामुळे जिल्हा प्रशासनाने पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना गुरुवारी सुट्टी देण्यात आली. सकाळच्या सत्रातील विद्यार्थ्यांना लवकर सोडण्यात आले तर, दुपारच्या




सत्रातील विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली. ठाणे जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून पाऊस पडत आहे. सोमवारी आणि मंगळवारी सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस झाला. या पावसादरम्यान अनेक झाडे उन्मळून पडली. बुधवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला होता. परंतु दिवसभर पावसाची संततधार सुरू होती.

## बारवी धरण ६० टक्के भरले, २४ तासांत ६ टक्क्यांची वाढ



बदलापूर: गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे सर्वच जलाशयातील पाणीसाठा वाढला असून ठाणे जिल्ह्यातील बहुतांश शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या बारवी धरणात गुरुवारी सकाळी सात वाजेपर्यंत पाणी साठा ६० टक्क्यांवर पोहोचला. गेल्या २४ तासात बारावी धरणक्षेत्रात १५४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे धरणात २०६.६७ घन मीटर पाणीसाठा होता. त्यामुळे समधान व्यक्त होते आहे.

ठाणे जिल्ह्यातील बहुतांश शहरांना बारवी धरणातून पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरणे आवश्यक आहे. यंदाच्या वर्षात बारवी धरणातील पाणीसाठा २५ टक्क्यांपर्यंत खाली आला होता. मात्र सुदैवाने पाणी कपात करण्याची वेळ आली नाही. जून महिन्यापासून पाऊस सुरू झाला असला तरी धरणक्षेत्रात समाधानकारक पाऊस होत नव्हता. त्यामुळे बारवी धरण संथगतीने भरत होते. मात्र गेल्या आठवड्यापासून बारवी धरणक्षेत्र, मुरबाड तालुका आणि आसपासच्या भागात संततधार पाऊस सुरू आहे. बुधवारी दिवसभर बारवी पणालोट क्षेत्रात १५४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे धरणात २०६.६७ घन मीटर पाणीसाठा झाला. तर धरणाने ६७.४० मीटर इतकी उंची गाठली. त्यामुळे गुरुवारी धरण ६०.९९ टक्के इतके भरले आहे. बुधवारी धरणात ५४ टक्के इतका पाणीसाठा होता.

## जि. प. ठाणे येथिल नाविण्यपूर्ण उपक्रम कर्मचाऱ्यांचे ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट



जि.प.ठाणे - जिल्हा परिषदेतील सर्व विभागाकडील कर्मचारी यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना संगणक हाताळणी, संगणकीय कामकाज व प्रशासकीय बाबी याकरिता साक्षर करण्यासाठी कर्मचाऱ्यांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट दि. २३ जुलै रोजी घेण्यात आली. शासनाकडून येणाऱ्या विविध योजना व मार्गदर्शक सुचना राबविण्याकरिता २६५ कर्मचारी यांचे ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात पार पडली.

कार्यालयीन कामकाजात कर्मचाऱ्यांना कामात येणाऱ्या अडचणींना लक्षात घेत १०० गुणांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट घेण्यात आली. दैनंदिन कामकाजात तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी तसेच दररोज नव्याने तांत्रिक बदल आत्मसात करण्यासाठी टेस्ट घेण्यात आली, अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) अविनाश फडतरे यांनी दिली.

कनिष्ठ सहाय्यक १६०, वरिष्ठ सहाय्यक ६९, सहाय्यक प्रशासन अधिकारी १२, कनिष्ठ प्रशासन अधिकारी २४ असे एकूण २६५ कर्मचारी यांची ट्रेनिंग निड असेसमेंट टेस्ट घेऊन डिजीटल माध्यमाचा वापर करण्यासाठी विशेष प्रयत्न जिल्हा परिषद ठाणे मार्फत करण्यात येत आहे. ई-ऑफिस, वर्ड, एक्सेल, पॉवरपॉईंट, कॉम्प्युटराईज टिपणी लेखन, पत्र लेखन प्रशासकीय विषयावरील टिपणीलेखन इत्यादी बाबतची प्रात्यक्षिक टेस्ट घेण्यात आली आहे. कर्मचारी वर्गात यामुळे उत्साहाचे वातावरण दिसून आले व त्यांनी या निमित्ताने पुन्हा प्रशासकीय अभ्यासाचे पुनर्विलोकन केले. कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेत वाढ करून लोकाभिमुक सेवा देण्यासाठी व प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी लाभदायक ठरणार आहे.

## उल्हास नदी काठच्या २२ गावांना सतर्कतेचा इशारा



कल्याण : मुसळधार पावसामुळे उल्हास नदी दुथडी भरून वाहत आहे. या नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे या नदी काठच्या अंबरनाथ, कल्याण, भिवंडी तालुक्यातील २२ गावांना महसूल प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.उल्हास खोऱ्यात मुसळधार पाऊस पडत आहे. हे पाणी उल्हास, काळू नद्यांमधून कल्याण, अंबरनाथ परिसरातून नद्यांमधून वाहत आहे. बुधवारी रात्रीपासून उल्हास, काळू नद्यांनी इशारा पातळी ओलांडून धोक्याच्या पातळीवरून वाहण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने या नदी काठी असलेल्या गावांना सावधानतेचा इशारा दिला आहे.पुराचे पाणी गावात घुसण्याची शक्यता असल्याने ग्रामस्थांनी पुरेशी काळजी घेऊन राहण्याच्या सूचना महसूल विभागाने दिल्या आहेत. सतर्कतेचा इशारा दिलेल्या गावांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. कल्याण तालुक्यातील वरप, मोहने, वालधुनी, कल्याण, आणे, भिसोळ, रायते, आपटी, दहागाव, मांजर्ली, अंबरनाथ तालुक्यातील बदलापूर, अंबरनाथ, एरंजाड, कुडसावरे, कान्होर, कासगाव, उल्हासनगर तालुक्यातील शहाड, म्हारळ, उल्हासनगर, भिवंडी तालुक्यातील दिवे, आगार, अंजूर, रांजनोली. या गावांच्या हद्दीत महसूल विभाग, पोलीस, आपत्कालीन पथकाने सज्ज राहण्याचे आदेश स्थानिक प्रशासनाने दिले आहेत.

## सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे (रजि.) यांच्यावतीने रविवारी विद्यार्थी दत्तक योजना व यशस्वी विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

ठाणेः - सुधागड तालुक्याच्या व तालुक्यातील रहिवाशांच्या विकासासाठी झटणारी संस्था सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे (रजि.) यांच्यावतीने रविवार 28 जुलै रोजी सायंकाळी 5 वाजता विद्यार्थी दत्तक योजना व यशस्वी विद्यार्थी गुणगौरव सोहळा संस्थेचे अध्यक्ष श्री. विठ्ठल घाडगे यांचे अध्यक्षतेखाली सहयोग मंदिर, घंटाळी रोड, ठाणे येथे आयोजित केला आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी व तालुकावासीयांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने करण्यात येत आहे. विशेष म्हणजे यंदा दैनिक जनादेशचे संपादक कैलाश म्हापदी यांना 'सुधागड मित्र' पुरस्काराने तर सुधागडातील ज्येष्ठ समाजसेवक आत्माराम खरीवले यांना 'जीवनगौरव' पुरस्कार व आर्किक्टेटची पदवी प्राप्त केलेल्या कु. पूर्वा दिपक दळवी हिचा विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमास सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर, सुधागड मित्र, (मार्गदर्शक) विजय तांबे, सुरेश मेश्राम, सुधागडमित्र तथा समाजसेवक विजय सागळे, उद्योजक तथा समाजसेवक अंजली व वसंत केळकर, सुधागड तालुका मराठा समाज कार्याध्यक्ष बळीराम निंबाळकर सर, सुधागड तालुका मराठा समाज सरचिटणीस सुजित सदाशिव बारस्कर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी दहावी, बारावी आणि उच्च शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच उपस्थितांचे स्वागत, विशेष पुरस्कारने सन्मानित मान्यवरांचा सत्कार, विद्यार्थी दत्तक योजने अंतर्गत आर्थिक मदतीचे वितरण, इ. 1 ते 9वी विशेष गुण संपादत विद्यार्थी बक्षिस वितरण, पदवीधर (डीग्री) परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषिक वितरण, 2024-25 या शैक्षणिक वर्षात सुधागड तालुक्यातील ग्रामीण भागातील पितृछत्र हरपलेल्या दिव्यांग व गरीब गरजु विद्यार्थ्यांना शालेय वार्षिक फी, शालयेपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.

## पूर परिस्थितीत प्रशासनामार्फत मदतीसाठी फिल्डवर बचाव कार्य सुरू – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



मुंबई : मुंबई, पुणे, रायगड परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी सुरू आहे. मात्र जिल्हा, मनपा प्रशासन सज्ज असून संबंधित अधिकारी आणि कर्मचारी हे फिल्डवर आहेत. ज्या-ज्या ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती आहे तिथे बचाव कार्य वेगाने सुरु आहे. काळजीचे कारण नाही, मात्र नागरिकांनी आवश्यकता असल्यास घराच्या बाहेर पडावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.एनडीआरएफ, एसडीआरएफच्या तुकड्या, लष्कर, नौदल, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य यंत्रणा या सर्वांनी समन्वयाने आवश्यकतेप्रमाणे एकमेकांना मदत करण्याचे निर्देश देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, एक टीमवर्क म्हणून काम करून पूर परिस्थितीतल्या लोकांना सुरक्षित हलविणे, त्यांना अन्नाची पाकिटे देणे, औषध, पाण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वेळप्रसंगी एनडीआरएफ, लष्कर, नौदल यांची मदत घेण्याच्या सूचना केल्या आहेत. पुणे, मावळ, मुळशी येथे धरण क्षेत्रात सुद्धा पाऊस जास्त पडला आहे, त्यामुळे पुण्याला फटका बसला आहे. मुंबई शहर आणि उपनगरमध्ये सुद्धा जोरदार पाऊस आहे.

■ मुंबईत कोणत्याही आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सतर्क असून मी पुणे, रायगड, मुंबई जिल्हाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्तांच्या संपर्कात आहे. पुण्याला संबंधित लष्कर व नौदल अधिकाऱ्यांशी मी बोललो आहे. एखाद्या ठिकाणी लोक अडकले असतील तिथे प्रसंगी हेलीकॉप्टरच्या उपलब्धतेबाबत सूचना दिल्या आहेत. मुंबईत कुर्ला, घाटकोपर येथे साठलेल्या पाण्याचा निचरा करण्याचे काम सुरु आहे. मुंबईत 255 पंप सुरु असून मुंबई मनपा आयुक्तांना संपूर्ण यंत्रणा या कामी लावण्याचे निर्देश दिले असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

■ मुंबईत पाऊस वाढल्याने मध्य पश्चिम आणि हार्बर रेल्वेच्या यंत्रणांना सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पाऊस आणि पूर परिस्थिती असलेल्या भागात शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे, माझे आपणास आवाहन आहे, की नागरिकांनी घाबरून जाऊ नये. मंत्रालय तसेच जिल्हा पातळीवरून प्रशासन परिस्थितीवर संपूर्ण नजर ठेवून आहे आणि यंत्रणा फिल्डवर उतरून काम करीत आहे, असेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

## स्मार्टरोडचा बकालपणा 7 दिवसांत दूर करा, नाही तर शिवसेना स्टाईल आंदोलन करू - माजी सभागृह नेते श्रेयस समेळ यांचा इशारा

कल्याण : केडीएमसी प्रशासनाने आपल्या अब्रूचे धिंडवडे काढण्याचा चंग बांधला आहे की काय असा प्रश्न निर्माण व्हावा असा संतप्त प्रकार समोर आला आहे. मोठा गाजावाजा करत बांधण्यात येत असलेल्या कल्याण पश्चिमेतील स्मार्टरोड हा बकालपणाचा अड्डा झाला असून हा बकालपणा 7 दिवसांत दूर करा अन्यथा शिवसेनास्टाईल आंदोलन करून हा रस्ता बंद करू. आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी केडीएमसी प्रशासनाची असेल असा इशारा माजी सभागृह नेते श्रेयस समेळ यांनी दिला आहे.

मुंबईतील मरीन ड्राईव्ह आणि नवी मुंबईतील पाम बीच रोडच्या धर्तीवर कल्याणातही एक सुंदर असा रस्ता असावा या दृष्टीकोनातून या स्मार्ट रोडला मंजुरी देण्यात आली. थोडेथोडके नव्हे तर तब्बल 60 कोटी रुपये खर्च करून कल्याण पश्चिमेच्या रौनक सिटी येथील रिंग रोड ते माधव संकल्प पर्यंत हा स्मार्ट रोड उभारण्यात येत आहे. या रस्त्याचे बहुतांशी काम पूर्ण झाले असून याठिकाणी आता आवश्यक सोयी सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. ज्यामध्ये सायकल ट्रॅक, जॉगिंग ट्रॅक, ई व्ही गाड्या चार्जर आदी सुविधांचा समावेश आहे.

यापैकी सायकल आणि जॉगिंग ट्रॅकचे काम पूर्ण झाले असून त्याजागी आता खाण्याच्या



अनधिकृत गाड्या, फेरीवाले, अनधिकृत मंडप उभे राहिले असल्याचे सभागृह नेते श्रेयस समेळ यांनी सांगितले. तर याहून कहर म्हणजे येथील गोदरेज हिलकडे जाणाऱ्या रस्त्यावर केडीएमसीच्या कचऱ्याच्या अनेक गाड्या उभ्या असून त्याठिकाणी रस्त्यावर सर्वत्र कचरा आणि घाणीचे साम्राज्य पसरले असल्याचा धक्कादायक प्रकारही समेळ यांनी उघडकीस आणला आहे. ज्यामुळे इथल्या नागरिकांना नाक मुठीत धरून आणि फुटपाथ असूनही चालायला जागा नसल्याने जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत आहे.

नागरिकांच्या करांमधून आलेल्या पैशांतून हा स्मार्ट रोड बांधण्यात येत असून केडीएमसी प्रशासन, प्रभाग अधिकारी, घनकचरा विभागाचे उपायुक्त यांना हा गलिच्छपणा दिसत नाही का ? की या सर्व अनधिकृत खाद्यपदार्थांच्या गाड्या, फेरीवाल्यांशी त्यांचे आर्थिक लागेबांधे असल्याने कारवाई केली जात नाहीये असे प्रश्नही समेळ यांनी उपस्थित केले आहेत.

तर केडीएमसी प्रशासनाने या स्मार्ट रोडवरील हा बकालपणा आणि गलिच्छपणा 7 दिवसांच्या आत दूर केला नाही तर आपण शिवसेना स्टाईल हा रस्ता बंद पाडू आणि त्याची संपूर्ण जबाबदारी केडीएमसी प्रशासनाची असेल अशा शब्दांत श्रेयस समेळ यांनी इशारा दिला आहे.

दरम्यान आधी शहर, स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी, मग रस्त्यांवरील खड्डे आणि आता स्मार्ट रोडवरील हा बकालपणा याद्वारे केडीएमसी स्वतःहून आपल्याच भोंगळ कारभाराचे धिंडवडे काढत आहे. ज्याला या शहरांतील जनता पार कंटाळून गेली आहेत. ज्यामुळे केडीएमसी प्रशासनाच्या या नाकर्तेपणाचे खापर आणि परिणाम येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## अटल सेतूवर कार थांबवत तरुणाची समुद्रात उडी, डोंबिवलीतल्या इंजिनिअरने आयुष्य संपवलं

नवी मुंबई : नवी मुंबईतल्या अटल सेतूवर कार थांबवत एक तरुण खाली उतरला, त्याने इकडे तिकडे पाहिलंही नाही. अवघ्या काही सेकंदात समुद्रात उडी घेतली आणि आयुष्य संपवलं. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मार्च महिन्यात किंजल शाह या महिला डॉक्टरने याच अटल सेतूवरुन उडी मारत आयुष्य संपवलं होतं. आता पुन्हा अशीच घटना घडली आहे. त्यामुळे अटल सेतू या आत्महत्येच्या घटनेमुळे चर्चेत आला आहे. तसंच या



प्रकरणी आता पोलीस पुढील तपास करत आहेत.

करुतुरी श्रीनिवासन हा तरुण त्याच्या टाटा नेक्सॉन कारने अटल सेतूवर आला. त्याने काहीही कळायच्या आत अवघ्या काही सेकंदात उडी मारली. बुधवारी दुपारी १२.३० च्या सुमारास ही घटना घडली. हा तरुण डोंबिवलीचा आहे. तो त्याच्या कार क्रमांक MH O5 EV 0849 मधून उतरला आणि अवघ्या काही सेकंदात खवळत्या समुद्रात स्वतःला झोकून दिलं. श्रीनिवासन हा कुवेतमध्ये नोकरी करत होता. मात्र वैफल्य आल्याने त्याने हे टोकाचं पाऊल उचललं आहे.


करुतुरी श्रीनिवासन हा तरुण अटल सेतूवर कार थांबवतो. त्यानंतर तो कारमधून उतरतो. काहीही कळायच्या आत अवघ्या काही सेकंदात तो समुद्रात उडी मारतो. हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. श्रीनिवास कुरुकुट्टी कुवैत येथील एका खासगी कंपनीत नोकरीला होता.

## माजी संमेलनाध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची श्रद्धांजली



मुंबई :- सामाजिक, साहित्यिक, पर्यावरण आणि अध्यात्मिक क्षेत्राला जोडणारा दुवा आणि ज्येष्ठ मार्गदर्शकाला महाराष्ट्र मुकला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात की, फादर दिब्रिटो यांनी धर्मप्रांतात शांतता, बंधुभाव, एकात्मता यासाठी काम करताना पर्यावरण प्रेमाची हरित वसई चळवळ उभी केली. संत साहित्याचा गाढा अभ्यास आणि त्यातून एकोपा साधण्याचा त्यांचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. मराठी साहित्यविषयक चळवळीत पर्यावरणप्रेमी भूमिका घेऊन केलेले लेखन हे त्यांचे आगळेपण आहे. 'सुवार्ता' या त्यांच्या नियतकालिकाने मराठी साहित्यात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे लेखन मराठी साहित्यात मोलाची भर घालणारे ठरले आहे. त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्षपदाचा मान देखील मिळाला. त्यांच्या निधनामुळे अशा विविध क्षेत्रांना जोडणारा निखळ दुवा निखळला आहे. फादर दिब्रिटो यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## अरमान मलिक-कृतिकाच्या ‘त्या’ आक्षेपार्ह व्हिडीओवरून वाद



‘बिग बॉस ओटीटी’चं तिसरं पर्व सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकलं आहे. यंदा अरमान मलिक व त्याच्या दोन पत्नी या शोमध्ये सहभागी झाल्या होत्या. यानंतर पुढे थोड्याच दिवसांत अरमानची पहिली पत्नी पायल मलिक घराच्या बाहेर पडली. सध्या अरमान व कृतिका या ‘बिग बॉस ओटीटी’मध्ये स्पर्धक म्हणून सहभागी आहेत. या दोघांचा कथित आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यापासून हा शो वादात सापडला आहे. ‘बिग बॉस ओटीटी’वर सर्व स्तरांतून टीका करण्यात येत आहे. आमदार मनीषा कायंदे यांनी देखील या कार्यक्रमाच्या विरोधात तक्रार करत शो बंद करण्याची मागणी केली आहे. सर्वत्र झालेल्या टीकेनंतर आता यावर जिओ सिनेमाकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

Bigg Boss OTT मधील हा व्हिडीओ छेडछाड करून व्हायरल करण्यात आल्याचं जिओ सिनेमाकडून सांगण्यात आलं आहे. यासंदर्भात ‘बिग बॉस ओटीटी’च्या निर्मात्यांनी बुधवारी ( २४ जुलै ) मुंबई पोलिसांच्या सायबर क्राइम विभागात तक्रार दाखल केली आहे.

“जिओ सिनेमा ॲपवर प्रसारित केल्या जाणाऱ्या सगळया कंटेटवर कंपनीचे लक्ष असते. यासाठी आमच्याकडे अत्यंत कठोर नियम व मार्गदर्शक तत्त्वे आहेत. ‘बिग बॉस ओटीटी’मधून अशाप्रकारचा कोणताही चुकीचा कंटेट प्रसारित झालेला नाही.

# चाळिशीनंतरही कतरिना इतकी तंदुरुस्त कशी?



बॉलीवूडच्या कलाकारांविषयी चाहत्यांना नेहमीच अधिकाधिक जाणून घेण्याची उत्सुकता असते. अनेक जण या कलाकारांना आपल्या खऱ्या आयुष्यात आदर्शही मानत असतात. त्यामुळे साहजिकच हे कलाकार आपल्या खासगी आयुष्यात कसे वागतात, काय करतात हे जाणून घेण्याची उत्सुकता चाहत्यांना असते. त्याबरोबरच हे कलाकार वयाच्या विशिष्ट टप्प्यानंतरही तंदुरुस्त राहतात. त्यामुळे त्यांची दिनचर्या काय असते आणि त्यांचा आहार काय असतो, हेदेखील चाहत्यांना जाणून घ्यायचे असते. आता अभिनेत्री कतरिना कैफचा आहार काय असतो, याचा खुलासा आहारतज्ज्ञांनी केला आहे.

कशी आहे कतरिना कैफची दिनचर्या?

योग प्रशिक्षक व आहारतज्ज्ञ श्लोका शाह यांनी ‘पिंकविला’ला नुकतीच मुलाखत दिली आहे. त्यावेळी त्यांनी कतरिना कैफची दिनचर्या कशी असते आणि तिचा आहार काय असतो याबद्दल सविस्तर सांगितले आहे. त्या म्हणतात, “कतरिना तिच्या शरीराचे खूप निरीक्षण करीत असते आणि तिने तिच्या शरीराला व्यवस्थित समजून घेतले आहे. ती इंटरनेटवर जे सांगितलं जातं, त्या बाबींचा कधीच डोळे बंद करून अवलंब करीत नाही. ती अशी व्यक्ती आहे, जिला सर्व प्रश्नांची उत्तरे हवी असतात. तिला माहीत आहे, अन्न हे औषधांसारखे आहे. त्यामुळे अन्नाचा दर्जा आणि त्याचा तिच्या शरीरावर काय परिणाम होणार आहे, हे ती जाणून घेते. ती दिवसातून दोन वेळा जेवण करते आणि घरी बनविलेले जेवण करण्यास ती प्राधान्य देते. तिला तिच्या शरीराबद्दल अनेक गोष्टी माहीत आहेत आणि त्यामुळे तिला तिच्या आहारात काही बदल करायचे असतील, जसे की लोहयुक्त पदार्थ किंवा कोणता ज्युस घ्यायला पाहिजे, असे प्रश्न जेव्हा कतरिनाला पडतात तेव्हा ती माझ्याबरोबर चर्चा करते.”

याबरोबरच पुढे बोलताना श्लोका शाह यांनी म्हटले आहे की, कतरिना आयुर्वेदालादेखील प्राधान्य देते आणि रोजच्या आयुष्यात त्याचा वापरदेखील करते. सकाळी आणि दुपारी जेवणानंतर शतपावली करणे, ऑईल पुलिंग यांसारख्या गोष्टींना ती प्राधान्य देते.

दरम्यान, कतरिना काही दिवसांपासून विकी कौशलच्या ‘तौबा तौबा’ गाण्यातील डान्सवर तिने दिलेल्या प्रतिक्रियेमुळे चर्चेत आहे. विकी कौशलने याबद्दल खुलासा केला होता. ‘तौबा तौबा’ गाण्याआधी ती विकीला वरातीत डान्स करणारा समजत असे; मात्र हे गाणे पाहिल्यानंतर तीचा हे मत बदलले, असे अभिनेत्याने म्हटले होते. त्याबरोबरच जेव्हा कतरिनाने त्या गाण्यावरील माझ्या डान्सचे कौतुक केले तेव्हा मला ऑस्कर मिळाल्यासारखे वाटल्याचे विकीने म्हटले होते. कतरिनाच्या कामाबद्दल बोलायचे, तर ती ‘टायगर व्हर्सेस पठाण’ चित्रपटात अभिनय करताना दिसणार आहे.

## नदीवर होणार उद्घाटन सोहळा, परेडमध्ये नेहमी ग्रीसचे खेळाडू पहिले का?



फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे ऑलिम्पिक २०२४ चे आजयोजन करण्यात आले आहेत. पॅरिस ऑलिम्पिकच्या उद्घाटन सोहळयासाठी हे शहर संपूर्ण तयारीनिशी सज्ज झाले आहे. पॅरिसमध्ये तिसऱ्यांदा या खेळांचे आयोजन करण्यात येत आहे. याआधी १९०० आणि १९२४ मध्ये ऑलिम्पिकचे आयोजन झाले होते. यंदाच्या ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा स्टेडियममध्ये नसून पहिल्यांदाच नदीवर होणार आहे. पॅरिस शहरातून वाहणाऱ्या सेन नदीवर हा सोहळा होणार आहे.


ऑलिम्पिक २०२४ तब्बल १० हजार खेळाडू सहभागी होणार असून त्यातील काही खेळाडू उद्घाटन समारंभाचा भाग असणार आहेत. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये खेळाडू बोटीतून परेड करतील. ही परेड सहा किमी इतकी लांब असेल जी सेन नदीवर होईल. ही परेड ऑस्टरलिट्झ ब्रिजपासून सुरू होईल आणि शहराच्या मध्यभागी जाऊन आयफेल टॉवरपर्यंत पोहोचेल. सुमारे ९४ बोटी या परेडचा भाग असतील.

ऑलिम्पिकमधील उद्घाटन समारंभासाठी देशांचा क्रम यजमान देशाच्या राष्ट्रीय भाषेच्या अक्षरानुक्रमे ठरवला जातो. त्यामुळे चायनीज तैपेई ताझिकिस्तान आणि टांझानिया यांच्यामध्ये १८०वा देश म्हणून मार्चपास्ट करतील.पॅरिस ऑलिम्पिक उद्घाटन समारंभात परेड ऑफ नेशन्समध्ये भारत ८४व्या क्रमांकावर येईल.उद्घाटन समारंभातील मार्चपास्टला सुरूवात लॉस एंजेलिसमधील १९०८ च्या ऑलिम्पिकमध्ये झाला.उद्घाटन समारंभाच्या मार्चपास्टमध्ये ग्रीसचे खेळाडू कायम प्रथम असतात. ऑलिम्पिक खेळांना १८९६ मध्ये अथेन्स, ग्रीस येथे सुरूवात झाली. हा देश ऑलिम्पिक खेळांचे जन्मस्थान मानला जातो. यासाठी ग्रीसचे खेळाडू आधी मार्चपास्ट करतात. या वर्षी ग्रीसचा ध्वजवाहक रेस वॉकर अँटिगोनी दृष्टीबिओटी असेल.

# मुकेश अंबानी आहेत देशातील सर्वांत मोठे आंबा बागायतदार

## भारतातूनच नव्हे तर परदेशांतूनही करतात अब्जावधींची कमाई

पेट्रोलियम, दूरसंचार आणि इतर अनेक क्षेत्रांतील विस्तारित उपक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या मुकेश अंबानी यांनी कृषी क्षेत्रातही अनपेक्षित स्थान निर्माण केले आहे. पण, आशियातील आघाडीचे उद्योगपती मुकेश अंबांनी हे देशातील सर्वात मोठे आंबा बागायतदार आणि निर्यातदारही आहेत हे तुम्हाला माहीत आहे का? जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल; पण रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनी ही जगातील सर्वात मोठ्या आंबा निर्यातदार कंपन्यांपैकी एक आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राबरोबर कृषी क्षेत्रातही अंबानी कुटुंबीयांचा दबदबा दिसून येत आहे.




६०० एकरांत पसरली बाग

गुजरातमधील जामनगरमध्ये रिलायन्सचे संस्थापक धीरूभाई अंबानी यांच्या नावावर असलेल्या ६०० एकर क्षेत्रावर ही बाग आहे. या बागेत २०० पेक्षा अधिक जातींची १.३ लाख आंब्याची झाडे आहेत. त्यात देशी-विदेशी झाडांचा समावेश आहे. त्यातून कंपनीला कोट्यवधी रुपयांची कमाई होते.

लखीबाग अमराई, असे या बागेचे नाव आहे. हे नाव १६ व्या शतकातील मुघल सम्राट अकबराने स्थापन केलेल्या ऐतिहासिक लखीबाग या उद्यानाला श्रद्धांजली अर्पण करते.

व्यवसायाची मुहूर्तमेढ कशी?

रिलायन्सने उद्योगसमूहाने आंब्याच्या व्यवसायात प्रवेश केला नव्हता; परंतु तसे करण्यास भाग पडले. रिलायन्सची गुजरातमधील जामनगर येथे रिफायनरी आहे. त्यामुळे लोकांना तीव्र प्रदूषणाचा सामना करावा लागत होता. पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करण्यासाठी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करण्यासाठी कंपनीने आजूबाजूच्या नापीक जमिनींचे विस्तीर्ण आंब्याच्या बागेत रूपांतर करण्याचा प्रकल्प सुरू केला. प्रदूषणाचा मुकाबला करण्यासह औद्योगिक परिसराभोवती एक शाश्वत हरित पट्टा निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश होता. त्यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी रिलायन्सने आंब्याच्या बागेची निर्मिती केली.

या बागेत केसर, अल्फोन्सो, रत्ना, सिंधू, नीलम व आम्रपाली यांसारख्या प्रसिद्ध भारतीय जातींसह फ्लोरिडा येथील टॉमी ॲटकिन्स, केंट व इस्रायलमधील लिली, कीट व माया या आंतरराष्ट्रीय जातींसह आंब्याच्या विविध प्रकारांच्या जातीही आहेत.

## ‘सुख म्हणजे...’ मालिका का सोडली?



‘बिग बॉस मराठी’चा बहुप्रतिक्षीत पाचवा सीझन आता लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सीझनची गेल्या काही दिवसांपासून प्रत्येकाच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. नव्या सीझनमध्ये कोण सहभाग घेणार याबद्दल आता चर्चा रंगू लागल्या आहेत. काही दिवसांपासून ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगांवकर बिग बॉसच्या घरात सहभागी होतील असं बोललं जात होतं. यासंदर्भात अनेक पोस्ट देखील व्हायरल झाल्या होता. या सगळयावर आता अभिनेत्रीने स्पष्टीकरण दिलं आहे.

‘सुख म्हणजे नक्की काय असतं’ या मालिकेतून निरोप घेतल्यावर वर्षा उसगांवकर ‘बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वात सहभागी होणार असल्याचं बोललं जात होतं याबाबत सांगताना अभिनेत्री ‘मुंबई टाइम्स’ला दिलेल्या मुलाखतीत म्हणाल्या, “मी बिग बॉसच्या घरात सहभाग होत नाहीये. ही कल्पना कोणाच्या डोक्यातून आली याबाबत मला काहीच माहिती नाही. खरंतर या सगळया अफवा आहे. येत्या काळात मी केलेल्या दोन ओटीटी वेबसीरिज प्रेक्षकांच्या भेटीला येतील. तसेच मी आता चित्रपटांकडे वळणार आहे. हिंदी-मराठी अशा दोन्ही भाषांमधील चित्रपटांमध्ये काम करण्यास मी उत्सुक आहे.”

वर्षा उसगांवकर ( varsha usgaonkar ) यांनी सांगितलं मालिका सोडण्याचं कारण‘सुख म्हणजे नक्की काय असतं’ ही मालिका सोडण्याबद्दल वर्षा उसगांवकर म्हणाल्या, “या मालिकेत मी जी भूमिका साकारत होते त्याला पुढे जास्त काही वाव नव्हता. मी आणि आमचे निर्माते आम्ही दोघंही हे जाणून होतो.

## दिनविशेष

**घटना**

२०१६ : सोलार इम्पल्स २ हे पृथ्वीभोवती फिरणारे पहिले सौर उर्जेवर चालणारे विमान ठरले.
२००८: अहमदाबाद बॉम्बस्फोट या हल्ल्यात किमान ५६ लोकांचे निधन तर २०० पेक्षा जास्त लोक जखमी.
२००५ : स्पेस शटल प्रोग्राम - STS-114 मिशन: डिस्कवरी उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००५ : मुंबई ढगफुटी - २४ तासांत ९९.५ सेंटीमीटर (३९.१७ इंच) पाऊस पडला, परिणामी पुरामुळे किमान ५,००० लोकांचे निधन.
१९९४ : उस्ताद बिस्मिला खान यांना राजीव गांधी सद्भावना पुरस्कार जाहीर.
१९७५ : लिझ ट्रस युनायटेड किंगडमच्या पंतप्रधान
१९७१ : अपोलो कार्यक्रम - अपोलो १५ चे प्रक्षेपण करण्यात आले.
१९६५: मालदीव - देशाला युनायटेड किंग्डम आणि इंग्लंड पासून स्वातंत्र्य.

**जन्म**

१९८६ : मुग्धा गोडसे - अभिनेत्री मॉडेल
१९७१: खलिद महमूद - बांगलादेशी क्रिकेटपटू
१९५५ : आसिफ अली झरदारी पाकिस्तानचे ११वे राष्ट्राध्यक्ष
१९५४: व्हिटास गेरुलायटिस अमेरिकन लॉन टेनिसपटू (निधन: १७ सप्टेंबर १९९४)
१९४९ : थाकसिन शिनावात्रा थायलंडचे पंतप्रधान
१९४२ : व्लादिमिर मेसियर स्लोव्हेकियाचे पंतप्रधान
१९३९ : जॉन हॉवर्ड - ऑस्ट्रेलियाचे २५वे पंतप्रधान
१९२८: इब्न-ए-सफ़ी - भारतीय- पाकिस्तानी लेखक आणि कवी (निधन: २५ जुलै १९८०)
१९२७ : गुलाबराय रामचंद भारतीय क्रिकेट खेळाडू

**निधन**

८११ : निसेफोरस - बायझेन्टाईन सम्राट
२०१५: बिजॉय कृष्णा हांडिक - भारतीय वकील आणि राजकारणी (जन्म: १ डिसेंबर १९३४)
२०१०: शिवकांत तिवारी भारतीय सिंगापुरियन राजकारणी (जन्म: २० डिसेंबर १९४५)
१९५२ : एव्हा पेरोन अर्जेन्टिनाचे अध्यक्ष जॉन पेरोन यांची पत्नी
१८९१: राजेन्द्रलाल मित्रा - प्राच्यविद्या संशोधक, एशियाटिक सोसायटीचे पहिले अध्यक्ष (जन्म: १५ फेब्रुवारी १८२४)
१८६७ : ओट्टो - ग्रीसचा राजा
१८४३ : सॅम ह्युस्टन - टेक्सासच्या प्रजासत्ताकचे राष्ट्राध्यक्ष
१३८०: कोम्यो जपानी सम्राट

# भारत-श्रीलंका मालिकेचे सामने लाइव्ह कुठे पाहता येणार?

भारत विरुद्ध श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला २७ जुलैपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेतील पहिला T20 सामना पल्लेकले येथील पल्लेकले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. टी-२० मालिकेतील भारतीय क्रिकेट संघाची कमान सूर्यकुमार यादवकडे आहे. तर श्रीलंकेच्या संघाचे नेतृत्त्व चरिथ असलंकाकडे असणार आहे. पण या मालिकेचे सामने कोणत्या स्पोर्ट्स चॅनेलवर लाइव्ह पाहता येणार आहेत, जाणून घ्या.

टी-२० विश्वचषक २०२४ नंतर भारतीय संघाला नवे प्रशिक्षक मिळाले आहेत. टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीरची हा पहिलाच दौरा असणार आहे. बीसीसीआयने या महिन्याच्या सुरुवातीला माजी भारतीय क्रिकेटपटूची टीम इंडियाच्या मुख्य



प्रशिक्षकपदी नियुक्ती केली होती. गौतम गंभीरच्या मार्गदर्शनाखाली केकेआरने यंदाचे तिसरे आयपीएल विजेतेपद पटकावले.अनेक महत्त्वाचे खेळाडू भारतीय टी-२० संघात परतले आहेत. टी-२० मालिकेनंतर संघाला तीन सामन्यांची वनडे मालिका खेळायची आहे. एकदिवसीय मालिकेत रोहित शर्मा टीम इंडियाचा कर्णधार असेल. एकदिवसीय मालिकेसाठी रवींद्र जडेजाला विश्रांती देण्यात आली आहे. अपघातानंतर ऋषभ पंतने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांनंतर वनडे संघातही पुनरागमन केले आहे. श्रेयस अय्यरही संघात परतला. शिवम दुबे आणि रियान पराग या नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. युझवेंद्र चहल आणि रिंकू सिंग यांना वगळण्यात आले आहे. भारत विरुद्ध श्रीलंकामधील टी-२० आणि वनडे मालिकेचे थेट प्रक्षेपण भारतात सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर होईल. सामन्याचे लाईव्ह स्ट्रीमिंग भारतात SonyLIV ॲप आणि वेबसाइटवर उपलब्ध असेल.

## राशि भविष्य

**मेष** – आजच्या दिवशी आराम करणे अत्यंत गरजेचे आहे. गेले काही दिवस अनेक प्रकारे मानसिक तणावात असल्यामुळे, थोडी मौज मजा, करमणूक केल्याने तुम्हाला चांगला आराम लाभेल. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा.

**वृषभ** – तुमच्यात आज उत्तम स्पुर्ती पहिली जाईल. तुमचे स्वास्थ्य आज पूर्णतः तुमची साथ देतील. या राशीतील जे लोक परदेशात व्यापार करतात त्यांना आज चांगला धन लाभ होऊ शकतो. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल. प्रणयराधन करण्याची शक्यता नाही आणि तुम्ही दिलेली महागडी, मौल्यवान भेटवस्तू याची जादू आज फारशी चालणार नाही.

**मिथुन** – दंतदुखी किंवा पोट बिघडण्यामुळे काही समस्या निर्माण होईल. ताबडतोब आराम पडावा यासाठी वैद्याकीय सल्ला घ्या. दिवसाच्या उर्वरित काळात पैशांची स्थिती सुधारेल. इतरांवर प्रभाव टाकण्याची क्षमता तुम्हाला बक्षीस मिळवून देईल. आज प्रेमी किंवा प्रेमिका आज खूप रागात असू शकतात यामुळे त्यांच्या घरातील स्थिती गंभीर असेल.

**कर्क** – संयम बाळगा, आपले निरंतर प्रयत्न आणि समजून घेण्यामुळे आपणास हमखास यशप्राप्ती होणार आहे. आपल्या पालकांनी केलेल्या मदतीमुळे आर्थिक अडचणींवर मात करणे शक्य होईल. तुमच्या मुलांसमवेत वेळ घालवा. प्रकृतीस बरे वाटेल. मुले ही अमर्यादित आनंदाचे स्रोत असतात.

**सिंह** – तुमची प्रचंड बौद्धिक क्षमता तुम्हाला दुबळेपणाशी, अपंगत्वाशी सामना करण्यास मदतगार ठरू शकेल. केवळ सकारात्मक विचारसरणी अवलंबिल्यामुळे या समस्येशी दोन हात करू शकेल. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे.

**कन्या** – भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. आर्थिक अडचणी टाळण्यासाठी सांभाळून खर्च करा. तुमच्या खाजगी आयुष्यात मित्र प्रमाणाबाहेर हस्तक्षेप करतील. तुमचे प्रेम एक वेगळी उंची गाठेल.

**तूळ** – चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आज जवळच्या मित्राच्या मदतीने काही लोकांना आज चांगले धन लाभ होण्याची शक्यता आहे. हे धन तुमच्या बऱ्याच समस्यांना दूर करू शकते. आपल्या भावाला परिस्थिती नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी मदत करा.

**वृश्चिक** – स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. दीर्घकालीन फायद्यासाठी शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरेल. अनपेक्षितपणे गोड बातमी समजल्याने तुमचा उत्साह वाढेल. तुमचया कुटुंबातील सदस्यांना ही बातमी सांगून तुम्ही आनंद द्विगुणित कराल.

**धनु** – अत्यंत व्यस्त दिवस असला तरी आरोग्य चांगले राहील. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी करावी लागेल आणि वैद्याकीय मदतीची गरज भासेल.

**मकर** – मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. ज्या लोकांनी कुठे गुंतवणूक केली होती आजच्या दिवशी तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे. कुटुंबियांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, यासाठी तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण ठेवा.

**कुंभ** – धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. महत्त्वाच्या व्यक्ती कधीही आर्थिक मदत द्यायला तयार असतील. पाहुण्यांचा सहवास आनंददायी असणारा दिवस. आपल्या नातेवाईकांसाठी काहीतरी खास योजना आखा, ते नक्कीच तुमचे कौतुक करतील.

**मीन** – उत्तम विनोदबुद्धी ही तुमची मालमत्ता आहे आणि ती वापरून तुम्ही तुमचा आजार बरा करा. चैतन्याने सळसळता असा आणखी एक दिवस, अनपेक्षित लाभ दृष्टीपथात असतील. कुटुंबातील लोकांसोबत आपली समस्या व्यक्त करण्यात तुम्हाला हलके वाटेल परंतु, बऱ्याच वेळा तुम्ही आपल्या अहंकाराला पुढे ठेऊन घरातील लोकांना गरजेच्या गोष्टी सांगत नाही.

### “महसूल सप्ताहानिमित्त ”विविध कार्यक्रमांचे आयोजन

# नागरिकांनी महसूल सप्ताहाचा लाभ घ्यावा -विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू

नवी मुंबई :- महसूल विभागामार्फत राज्यात 1 ऑगस्ट हा “महसूल दिन” साजरा करण्याबरोबरच 1 ते 7 ऑगस्ट 2024 या कालावधीत “महसूल सप्ताह” साजरा करण्यात येणार आहे. या सात दिवसात कोकणातील प्रत्येक जिल्हयात शासनाने दिलेल्या सूचनांबरोबरच नाविण्यपूर्ण उपक्रम राबवावेत, असे आवाहन विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू यांनी केले आहेत.

या सप्ताहात महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसूल कामे वेळेत पूर्ण करून त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, वसूलीच्या नोटीसा पाठवणे, मोजणी करणे इत्यादी कामे वेळापत्रकानुसार करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आणि महसूल उद्दिष्ट पूर्ण करणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यासाठी 1 ऑगस्ट रोजी ‘महसूल दिन’ साजरा करण्यात येणार आहे.

1ऑगस्ट रोजी “मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण” योजनेच्या प्रचार व प्रसिध्दीने “महसूल दिन” आणि “महसूल सप्ताहाचा” शुभारंभ होणार आहे.

2 ऑगस्ट रोजी “मुख्यमंत्री युवा कार्या प्रशिक्षण” योजनेतर्गत जास्तीत जास्त युवकांना लाभ मिळवून देण्याकरीता अधिवास प्रमाणपत्र, आधारकार्ड इत्यादी आवश्यक कागदपत्रे तातडीने उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

3 ऑगस्ट रोजी सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे 60 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना “मुख्यमंत्री तीर्थ दर्शन” योजनंतर्गत राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटी/दर्शनाच्या संधीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, दाखले, प्रमाणपत्रे,तातडीने उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष शिबारांचे आयोजन करण्यात येणार आहेत.

4 ऑगस्ट रोजी “स्वच्छ सुंदर माझं कार्यालय” ही विशेष मोहीम राबवून जिल्हा, तालुका, मंडळ व ग्रामस्तरावरील कार्यालय व परिसरातील स्वच्छता करण्यात येणार आहे. कार्यालयाचे अभिलेख व दस्तऐवज यांचे वर्गिकरण, व्यवस्थापन, संगणकीकरण यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

5 ऑगस्ट रोजी सीमेवर तैनात सैनिक तसेच शहिदांच्या कुटूंबीयांना मदत, त्यांना जमीन वाटप, संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ या कार्यक्रमाचे आयोजन.

6 ऑगस्ट रोजी “एक हात मदतीचा दिव्यांगाचा कल्याणाचा” या उपक्रमातर्गत दिव्यांग व्यक्तींकरीता शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमाची माहिती तसेच या योजनांचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असणाऱ्या महसूल विभागांशी संबधित विविध दाखले व प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

विविध योजनांतर्गत दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या लाभांच्या अनुषंगाने जिल्हा, तालुकास्तरावर शिबीर आयोजित करुन स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने उपकरणांचे वाटप करण्यात येणार आहे.

7 ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील जिल्हयात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित बाबी निकाली काढण्यासाठी ‘महसूल संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांशी संवाद’ हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी ठाण्यातील शाळांना सुट्टी : आयुक्त सौरभ राव



ठाणे – ठाणे शहरात आज पहाटेपासूनच पावसाची संततधार सुरू असून एका दिवसात 180 मि.मी इतका पाऊस झालेला आहे. तसेच हवामानखात्याने रेड ॲलर्ट जाहीर केला होता, त्यानुसार पूर्वतयारी म्हणून आपत्कालीन यंत्रणा कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज ठेवण्यात आली आहे. आज झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी ठाणे महापालिकेतील आपत्कालीन कक्षास भेट देवून दिवसभरातील परिस्थितीचा आढावा घेतला, तसेच उद्या देखील मोठी भरती असल्याने महापालिका हद्दीतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे आदेश आयुकतांना संबंधितांना दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत गेडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, सचिन पवार, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वाय.एम. तडवी आदी उपस्थित होते. शुक्रवारी देखील मोठी भरती असून रेड ॲलर्ट जाहीर केला असल्याने महापालिका हद्दीतील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली असल्याचेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले. तसेच नागरिकांकडून आपत्ती व्यवस्थापन कक्षास प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या दृष्टीने प्रभाग समिती निहाय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच शहरातील सखल भागात पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीकोनातून पंप बसविण्यात आले असून पुरेसे मनुष्यबळ व आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचेही आयुक्तांनी यावेळी सांगितले.नागरिकांची गैरसोय होवू नये यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन विभागात 20 पेक्षा जास्त फोनची सुविधा 24x7 कार्यान्वित आहेत. तसेच आलेल्या प्रत्येक फोनच्या तक्रारीचे निवारण पूर्ण होईपर्यत संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला जात असल्याचेही आयुकत सौरभ राव यांनी नमूद केले.

आज झालेल्या पावसामुळे नौपाडा- कोपरी परिसरातील पेढ्या मारुती मंदिर, वंदना सिनेमा परिसर, सिडको बस डेपो, चिखलवाडी, बारा बंगला, मेंटल हॉस्पिटल परिसर या ठिकाणच्या सखल भागात साचलेल्या पाण्याचा उपसा करण्यासाठी पंप बसविण्याची कार्यवाही करुन पाण्याचा निचरा करण्यात आला. तसेच कोपरी नौपाडा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात परिमंडळ उपायुक्तांनी भेटी देवून सी 1 आणि सी 2 या धोकादायक व अतिधोकादायक इमारती रिकामी करण्याची कार्यवाही करण्यात आली.

## ज्येष्ठ साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

मुंबई :- “अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी मराठी साहित्य, सामाजिक आणि पर्यावरण चळवळीत मोलाचे योगदान दिले आहे. भारतीय संस्कृती आणि संत साहित्याचा गाढा अभ्यास असलेल्या ख्रिस्ती धर्मगुरु फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी समाजात एकता, बंधुता, शांतता, सामाजिक सलोखा रहावा यासाठी व्याख्यानांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम केले. ‘सुवार्ता’ साप्ताहिकाच्या माध्यमातून पर्यावरण, नागरी, सामाजिक प्रश्न प्रभावीपणे हाताळले. हरित वसई चळवळीसाठी त्यांनी तळमळीने केलेले काम सदैव लक्षात राहील. त्यांच्या निधनानं पर्यावरणवादी विचारांचा कृतीशील साहित्यिक आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. मी त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि अनुयायांच्या दु:खात सहभागी आहे,” अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या कार्याचं स्मरण करुन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## तारा माऊली सेवाभावी संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना मोफत वहया वाटप...

ठाणे -: ठाण्यातील तारामाऊली सेवाभावी संस्था आयोजित भाजपाचे माजी नगरसेवक भरत चव्हाण व भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव ओमकार चव्हाण यांच्या पुढाकाराने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत कोपरी पूर्व परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. तारा माऊली सेवाभावी संस्था गेली 18 वर्ष सातत्याने या उपक्रमाचे आयोजन करते ,तसेच सामाजिक ,आरोग्य ,शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असते. ठाण्यातील कोपरी पूर्व आनंद बँक्वेट हॉल येथे गुरुवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपाचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, जेष्ठ माजी नगरसेवक भरत चव्हाण, भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव ओमकार चव्हाण तसेच भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते तारा माऊली सेवाभावी संस्थाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## सायबर सुरक्षा अधिक भक्कम करण्यावर भर सायबर गुन्हेमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नशील - मुख्य सचिव सुजाता सौनिक

### व्हॉट नाऊ संस्थेच्या हेल्पलाईनचे उद्‌घाटन




मुंबई : सध्या समाजात डिजीटल साधनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. मात्र, ऑनलाईन व्यवहारांच्या माहिती अभावी अनेकांची फसवणूक होण्याच्या घटनाही घडत आहेत. अशा परिस्थितीत राज्यातील सायबर सुरक्षा अधिक भक्कम करून सायबर गुन्हेमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. ‘व्हॉट नाऊ’ ही संस्था सायबर जनजागृतीबाबत काम करीत आहे. अशा उपक्रमांना शासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, असे प्रतिपादन राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात महाराष्ट्र युवा सायबर सुरक्षा उपक्रम तसेच ‘व्हॉट नाऊ’ संस्थेच्या 9019115115 या हेल्पलाईनचे उद्घाटन मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. बृहन्मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे पोलीस महासंचालक बी. के. सिंग, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह, 'व्हॉट नाऊ'च्या फाऊंडर निती गोयल, निवेदिता श्रेयांस आदी यावेळी उपस्थित होते.

### महापे येथे सायबर सुरक्षा केंद्राची उभारणी

सायबर गुन्हे व ऑनलाईन छळवणूकीच्या प्रकारांमुळे युवकांवर विपरीत परिणाम होत असल्याचे सांगत मुख्य सचिव श्रीमती सौनिक म्हणाल्या की, महाराष्ट्रात सायबर गुन्ह्यांवर प्रतिबंध व उलगड्यासाठी यंत्रणा मजबूत करण्यात येत आहे. महापे येथे सायबर सुरक्षेबाबत केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. व्हॉट नाऊ संस्थेने हेल्पलाईन क्रमांक जारी करून सर्वांना सायबर सुरक्षा देण्याविषयी पाऊल उचलले आहे. यासोबतच राज्याच्या पोलीस विभागाची सायबर गुन्ह्यांमध्ये मदतीसाठी 1930 क्रमांकाची हेल्पलाईन सुरू आहे. ऑनलाईन व्यवहार व वर्तनाबाबत फसवणूक झाल्यास न घाबरता पुढे येवून या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी. तसेच संबंधित पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## Nine killed as torrential rain continues in Gujarat



Gujarat rains, Gujarat torrential rain, Gujarat torrential rain deaths, Gujarat lighting strike, Gujarat flood, NDRF rescue operation, three persons died at Devbhumi Dwarka, hundreds rescued safely, Gujarat news, Indian express newsNine people were killed and hundreds shifted to safety on Wednesday, as torrential rain continued to lash various parts of Gujarat.According to a statement issued by the government, while three persons died at Devbhumi Dwarka, two each died at Banaskantha and Kutch and one each at Rajkot and Surat. The deaths occurred due to lighting strike and flooding, it added.Till 6 pm on Wednesday, Gujarat has received 461.22 mm of rainfall, which is 52.33 per cent of the total average rainfall it receives in the season. Kutch has received maximum rainfall at 75.50 mm, followed by Saurashtra (73.36%), south Gujarat (62.04%), east and central Gujarat (31.38%) and north Gujarat (31.38%).

## 3 cyber police officers in Delhi booked for bribery, extortion



The police ordered an inquiry into the incident on April 20, 2023, based on Suson’s complaint at DCP West Delhi, Vigilance on March 13.The police ordered an inquiry into the incident on April 20, 2023, based on Suson’s complaint at DCP West Delhi, Vigilance on March 13. (File Photo)

Three police officers attached to Hari Nagar cyber police station in New Delhi have been booked for bribery and extortion in a complaint filed by a student of Amity University who was falsely implicated in an OTP fraud case in 2023.

The police at the Vigilance Station registered a case against Sub-Inspector Brijesh Redhu, Head Constable Satish Kumar and Head Constable Anil Yadav on July 10 under sections 384 (extortion) and 34 of IPC and section 7 (bribery) of the Prevention of Corruption Act.

“The police officers have not yet been suspended, as the investigation is ongoing,” a police officer with Vigilance police station said.

## आम्हाला न सांगता एवढं पाणी का सोडलं?

### पुण्यातील महिलेनं थेट आयुक्तांनाच विचारला जाब




पुणे : पुण्याच्या खडकवासला धरणातून गुरुवारी पहाटे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे पुणे शहर व आसपासच्या अनेक भागांमध्ये पाणी साचलं आहे. काही ठिकाणी साचलेल्या पाण्याची पातळी २ ते ३ फूट इतकी आहे. खडकवासला धरण व धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचं उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. दरम्यान, सरकारच्या या निर्णयामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. अचानक परिसरात पाण्याची वाढ झाल्याने महिला, रुग्ण आणि नवजात बालकांचे हाल झाले आहेत. काहींनी पुणे महानगर पालिकेच्या आयुक्तांवरच टीका केली आहे.

पुण्यातील एकता नगरमधील एका महिलेने टीव्ही ९ शी संवाद साधताना प्रशासनावर टीका केली. त्या म्हणाल्या, “रात्री पाणी सोडण्याआधी पूर्वसूचना का दिली नाही? आमचं वाटोळं झालं आहे, त्यामुळे आयुक्तांना आधी येथे बोलवा. त्यांनी रात्री का पाणी का सोडलं? असा जाब त्यांनी विचारला.

“दहा दिवसांच्या बाळाला पाण्यातून बाहेर काढलं आहे. अडीच किलोच बाळ आहे, आजारी बाळ आहे. पण कोणी मदतीला आलं नाही. आम्ही रात्रीपासून जागे आहोत. आता कोणी सुद्धा यायचं नाही इथं. न सांगता पाणी सोडलं. आमची वाट लागली आहे. कोणत्याही नगरसेवकाने इकडे यायचं नाही. आम्ही उपाशी राहणार नाही. आमचे नातेवाईक आहेत येथे खायला द्यायला.

## वेबिनारच्या माध्यमातून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

### उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण1 ऑगस्ट पासून अर्ज करता येणार




ठाणे (जिमाका): राज्य शासनाने रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या पालकांच्या मुलीचे पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण मोफत केले आहे. या योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे 1 ऑगस्ट पासून https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले.

ऐरोली येथील पार्थ नॉलेज नेटवर्क येथे उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दूरदृश्यप्रणालीद्वारे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल, तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, संचालक विनोद मोहितकर, संबधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने विविध शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो. या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रित माहिती विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधींना व्हावी, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी वेबिनारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी हा संवाद साधला.

या वेबिनारमध्ये संपूर्ण राज्यातून जवळपास 6 हजार शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थिनी, पालक व संस्थांचे प्रतिनिधी ऑनलाईन सहभागी झाले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. पाटील म्हणाले की, या योजनेमध्ये प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क समावेश आहे. शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता संबंधित विद्यापीठ, तंत्रशिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादीकडून आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क व शासन मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे १०० टक्के मर्यादेपर्यंत परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल. शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थीनींनी प्रवेश घेतलेला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत, अशा महाराष्ट्रातील विद्यार्थीनी विहित अटी व शर्तीची पूर्तता करतील, अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

## Thomas Cook ex-employee in Mumbai siphons off nearly Rs 1 crore, booked




The police have asked Thomas Cook to submit a copy of the audit report, which would have details of all the fraudulent transactions so as to collect evidence against Rao. (Express Photo) Global tour and travel company Thomas Cook India has filed a complaint against its former assistant manager in Mumbai for siphoning off nearly Rs 1 crore, the police said. The MIDC police in Mumbai on Wednesday registered a case against Nagesh Santosh Rao, who had worked for the company between 2016 and February 2023. Rao was posted as an implant (an employee deputed to a company’s regular big business house clients) with an Andheri-based regular client of the complainant company. Implants are deputed to take care of the flights and other bookings for the employees of the client company. According to the police, Thomas Cook India Limited noticed the fraud when it sought claim of the bill vouchers of their Andheri-based client. The client company informed them that out of the total claim, 250 flight tickets and 35 invoices amounting to Rs 94.07 lakh were neither booked or utilised by their employees and hence refused to pay that amount, investigators said.

